कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

प्रवेश पात्रता विभाग

जा.क्र.कबचौउमवि/०६/प्रवेश/ ३५ /२०२५ दि.३१.०५.२०२५

**परिपत्रक क्र.३२ / २०२५**

**प्रति,**
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी,
संलग्नीत सर्व कला, वाणिज्य व विज्ञान, अभियांत्रिकी महाविद्यालयांचे
प्राचार्य आणि मान्यता प्राप्त परिसंस्था यांचे संचालक यांना..

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये व्दितीय वर्ष उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसोबत अनुत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांना तसेच प्रथम वर्ष अे.टी.के.टी विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता तृतीय वर्षात प्रवेश देण्याबाबत.

**संदर्भ** :- विद्यापीठाचे परिपत्रक क्र. १३ / २०२४, दि.१४.०६.२०२४.

**महोदय / महोदया,**

उपरोक्त संदर्भीय परिपत्रकाच्या अनुषंगाने, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० नुसार शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सर्व संलग्नीत कला, वाणिज्य व विज्ञान आणि अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये चार वर्षीय पदवी स्तरावर अभ्यासक्रम लागू करण्यात आले आहे.

वरील बाब लक्षांत घेऊन शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत **दि.११.०६.२०२४** रोजी झालेल्या मा.विद्या परिषद सभेत **ठराव क्र.वि.प.ए- १००/२०२४** नुसार खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

**" शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून पदवी स्तरावर ( UG ) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण -२०२० नुसार अभ्यासक्रम लागू करण्यात येत असल्याने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये प्रथम वर्ष उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसोबत अनुत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता व्दितीय वर्षात प्रवेश देण्यात यावे. "**

नैसर्गिक न्याय तत्वानुसार सदरची सवलत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये तृतीय वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सुरु ठेवण्याकरिता सदरचा विषय दि.२६.०५.२०२५ रोजी झालेल्या मा.विद्या परिषद सभेत ठेवण्यात आला असता, मा.विद्या परिषद सभेने **ठराव क्र.४६/ २०२५, दि.२६.०५.२०२५** नुसार खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

**" शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये व्दितीय वर्ष उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसोबत अनुत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांना तसेच प्रथम वर्ष अे.टी.के.टी विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता तृतीय वर्षात प्रवेश देण्यात यावे. "**

तेव्हा, सदरची बाब महाविद्यालयांतील विद्यार्थी / विद्यार्थ्यांनीसह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावी ही विनंती.

कळावे.

आपला विश्वासू,
( डॉ.विनोद प्र.पाटील )
कुलसचिव

**प्रत माहितीसाठी**
१.मा.प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि.,जळगांव.
२) मा.कुलसचिव कार्यालय, कबचौउमवि.,जळगांव.
३) मा.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, कबचौउमवि,जळगांव.
४) मा.वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि, जळगांव.
५) मा.उपकुलसचिव,संलग्नता विभाग कबचौउमवि, जळगांव.६) समन्वयक ई-सुविधा केंद्र, कबचौउमवि,जळगांव.